**<u>सत्र खटला क्र. ८८/२०२३</u>**

सरकार –वि– विशाल कासारे

**निशाणी क्र. ८५**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | सचिन प्रभाकर पाटील |
| वय | – | ४३वर्षे |
| पदनाम | – | सहाय्यक पोलीस निरिक्षक |
| राहणार | – | पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलडाणा |

**<u>सरतपास सरकारी वकील श्री. एस. पी. हिवाळे यांचे मार्फत –</u>**

दिनांक ०६/१०/२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन, अमडापूर येथे ठाणेदार म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी ज्योती सुभाष सुरुशे यांनी आकस्मीक मृत्युच्या नोंदीचा रिपोर्ट दिला. त्या रिपोर्टच्या अनुषंगाने मर्ग क्र. ३५/२३ नोंदविण्यात आला. आता मला निशाणी क्र. ६७ वरील मर्ग दाखविण्यात आल, तो तोच आहे. दिनांक ०७/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन, अमडापूर येथे दिला. त्यांच्या सांगण्यानुसार मी तो टंकलिखीत केला. सदर रिपोर्ट फिर्यादीची मयत मुलगी सपना हिला आरोपींनी शारिरीक व मानसिक त्रास दिला म्हणून तिने आत्महत्या केली असल्याची फिर्याद दिली होती. सदरची फिर्याद टंकलिखीत करुन मी फिर्यादीस वाचून दाखविली होती, त्यावर तिचा अंगठा घेतला होता. आता मला निशाणी क्र. ५७ वरील फिर्याद दाखविण्यात आली ही तिच आहे. त्या अनुषंगाने निशाणी क्र. ५८ वरील प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला, हा तोच आहे. सदर सदर घटनेपूर्वी मयत सपना आणि तिची आई हिने मेहकर येथे दिनांक ०१/१२/२०२१ रोजी आरोपींविरुध्द (एन.सी) अदखलपात्र गुन्हा क्र. ८०६/२०२१ दाखल केला. त्या गुन्हयाची सत्यप्रत प्रकरणात दाखल केली आहे. आता मला ती दिनांक ०१/१२/२०२१ रोजीच्या अदखलपात्र गुन्हयाची सत्यप्रत दाखविण्यात आली, ही तिच आहे, त्यावर पोलीस निरिक्षक यांची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर प्रतीला **<u>निशाणी क्र. ८६</u>** देण्यात येते. त्यानंतर, पुन्हा दिनांक २१/०७/२०२२ रोजी मयत सपना हिने मेहकर पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिला होता. त्याचा अदखलपात्र गुन्हा क्र. ३६८/२०२२ आहे. त्याची प्रत प्रकरणात दाखल आहे, त्या प्रतीला **<u>निशाणी क्र. ८७</u>**

देण्यात येते. त्यानंतर, दिनांक १२/०६/२०२३ रोजी (एन.सी) अदखलपात्र गुन्हा क्र. २५१/२०२३ मयत सपना हिने पोलीस स्टेशन, अमडापूर येथे दिला होता. आता मला तो अदखपात्र गुन्ह्याची सत्यप्रत दाखविण्यात आली, ही तिच आहे, त्यावर मयत सपना आणि ठाणेदाराची सही आहे, त्या प्रतीला **<u>निशाणी क्र. ८८</u>** देण्यात येते. त्यानंतर, मी माझे सहकारी पी.एस.आय. धनंजय इंगळे यांच्याकडे सोपविला.

**<u>उलटतपास आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. जावेद शेख यांच्या मार्फत –</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेचा रिपोर्ट पोलीस स्टेशनला दुसऱ्या दिवशी देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट घटनेच्या दुसऱ्या दिवशी देण्याचे कारण मी फिर्यादीस विचारले नाही ते तिच्या फिर्यादमध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी शिक्षीत आहे किंवा नाही याची विचारपुस केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद वरील नमुद अंगठ्यावरील नमुद नांव माझ्या हस्ताक्षरात नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरणात दाखल केलेला मेहकर येथील एन. सी रिपोर्टबाबत मी स्वतः पत्र व्यवहार केला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, गुन्हयाचा तपास मी त्याच दिवशी माझ्या सहकार्याकडे हस्तांतरीत केला. हे म्हणणे खरे आहे की, अदखलपात्र गुन्हयावरुन मी गुन्हयाची चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या म्हणण्यानुसार मयत सपना हिच्या आत्महत्येविषयीचारिपोर्ट टंकलिखीत केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीचा रिपोर्ट तिच्या म्हणण्यानुसार टंकलिखीत केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीला रिपोर्ट वाचून आणि समजुन सांगितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मयत सपना हिचा कोणत्याही प्रकारचा शारिरीक आणि मानसिक छळाबाबत रिपोर्ट दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या मर्ग वरुन गुन्हयाची नोंद केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता फिर्यादीच्या सांगण्यानुसार गुन्हयाची नोंद केली. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रकरणात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

दि. १९/११/२०२५ समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

Sd/-

**( आर. के. शर्मा )**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

बुलडाणा